४.२०
१०-३-२०२३
आ. प.

# उल्हासनगर महानगरपालिका

## पर्यावरण विभाग

## प्रेस नोट

केंद्र शासनाच्या वने, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडील राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम (NCAP) तसेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडील माझी वसुंधरा अभियान अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत नागरीकांमध्ये स्वच्छ, सुंदर व प्रदुषणमुक्त उल्हासनगर शहर बनविण्यासाठी विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे, त्याचाच एक भाग म्हणून दिनांक 10/03/2023 रोजी इलेक्ट्रीक वाहनांचा प्रचार जनजागृती कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने १५ वा वित्त आयोग अंतर्गत शहरातील हवेचा दर्जा सुधारण्यासाठी (Air quality Improvement) उल्हासनगर शहरासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर निधीतुन उल्हासनगर शहरातील हवेचे प्रदुषण कमी करण्यासाठी हाती घ्यावयाच्या कामांचे नियोजन / आराखडा पर्यावरण विभागाकडून तयार केला आहे

पर्यावरण विभागाकडून नियोजित केलेली कामे प्रामुख्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, विद्युत अभियांत्रिकी विभाग, सार्वजनिक अरोग्य विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग, वाहन विभाग तसेच पर्यावरण विभागाकडून पार पाडली जात आहेत.

केंद्र शासनाच्या १५ वा वित्त आयोगा अंतर्गत शहरातील हवेचे प्रदुषण कमी करण्यासाठी पर्यावरण विभागाकडून खालील कामांचे नियोजन करण्यात आले आहे.

१) इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन उभारणे.
२) 02 Dust Power Swiping चीखरेदी.
३) 02 Mist Spray Machine ची खरेदी.
४)30 इलेक्ट्रिक बसेस खरेदी करून बस सेवा सुरु करणे.
५)Animal Iincineration Center उभारणे.
६)CNG Based Crematorium उभारणे.
७)शहरातील रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे तयार करणे.
८)शहरातील चौकात Verticle Garden उभारणे.
९)शहरातील चौकामधील कारंजे सुस्थितीत ठेवणे.
१०)शहरात हवेची गुणवत्ता दर्शविणारे फलक प्रसिद्ध करणे.
११)महापालिकेच्या इमारतीवर रुफ टॉप सोलर सिस्टीम बसविणे.
१२)पर्यावरणाविषयी जनजागृतीवर कार्यक्रमांचे आयोजन करणे.
१३)रस्त्याच्या दुभाजकांवर वृक्षरोपण करणे.

वरीलपैकी काही कामांची पूर्तता झाली असून काही कामे प्रगतीपथावर सुरु आहेत. उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी नागरीकांनी पेट्रोल-डिझेलच्या वाहनांचा वापर कमी करून इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवावा व सदर इलेक्ट्रिक वाहने चार्जिंग करिता महापालिकेने सुरु केलेल्या चार्जिंग स्टेशनचा लाभ घ्यावा याबाबत नागरिकामध्ये जनजागृती करणेसाठी आजच्या कार्यक्रमाचे नियोजन मा.आयुक्त अजीज शेख आणि अतिरक्त आयुक्त डॉ करुणा जुईकर तसेच उप - आयुक्त (पर्यावरण) डॉ.सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख सौ विशाखा सावंत व लिपिक श्री सयाजी घाटविसावे यांनी केले आहे.

सदर कार्यक्रमासाठी श्री. जमीर लेंगरेकर, अति. आयुक्त, श्री. मनिष हिवरे, सहा. सार्व. आरोग्य अधिकारी, श्री. एकनाथ पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक, सौ. प्राजक्ता कुलकर्णी, प्रभाग अधिकारी, श्री. दत्तात्रय जाधव, प्रभाग अधिकारी, श्री. विनोद केणे, मुख्य स्वच्छता निरीक्षक, सौ. श्रध्दा बाविसकर, सिस्टिम अॅनालिस्ट, श्री. महेंद्र धिंडे, अभियंता विद्युत विभाग, सौ.छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, श्री. राजा बुलानी, विधी अधिकारी,श्री. अंकुश कदम, भांडार विभागप्रमुख व इतर कर्मचारी उपस्थित होते.

(डॉ.सुभाष जाधव)
उप- आयुक्त (पर्यावरण)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम अॅनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner